माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल आलेली तक्रार

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ५२१/२०१९**

तक्रारकर्ता श्री. वसंतलाल मेघजी नंद

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-२**
निवासी कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, कलानगर, वांद्रा (पूर्व), मुंबई-५१.

**कार्यकारी अभियंता इमारत प्रस्ताव/शहर-१**
बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय, न्यू बिल्डिंग, सी.एस.नं. ३५५, भगवान वाल्मिकी चौक,
हनुमान मंदिर, विद्यालंकार मार्ग, अँन्टॉप हिल, वडाळा (प), मुंबई-३७.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा निवासी कार्यकारी अभियंता**
निवासी कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, कलानगर, वांद्रा (पूर्व), मुंबई-५१.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १२.०३.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००१४०३ प्रकरणी आयोगाने दि.०७.०६.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहिती संबंधीत सार्वजनिक प्राधिकरण यांच्याकडून प्राप्त करुन अपिलार्थी यांना एक महिन्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी. या आदेशासह अपील निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. १०.१२.२०१९ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता- २, निवासी कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, वांद्रा, मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. ०७.०१.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता- २, निवासी कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, वांद्रा, मुंबई यांच्याकडून दि. २४.०१.२०२० रोजीचा अहवाल आयोगास प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये नमुद केले आहे की, तक्रारकर्ता यांनी मागितलेली माहिती बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालयाशी संबंधीत असून जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, कार्यकारी अभियंता/ इमारत प्रस्ताव, शहर- २, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याशी पत्रव्यवहार करुन माहिती मागविली आहे. परंतु, अद्यापपर्यंत कोणतीही माहिती संबंधीत कार्यालयाकडून प्राप्त झालेली नाही.

..२/-

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, गृहनिर्माण भवन, बांद्रा, मुंबई व जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ.प्र.) शहर, बृहन्मुंबई महानगरपालिका उपस्थित असून जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ.प्र.) शहर, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सादर केले की, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, गृहनिर्माण भवन, बांद्रा, मुंबई यांच्याकडून कोणतेही पत्र प्राप्त नाही. तसेच, संबंधीत नस्ती उपलब्ध आहे व तक्रारकर्ता यांना देता येईल. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, गृहनिर्माण भवन, बांद्रा, मुंबई यांनी माहिती जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ.प्र.) शहर, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडून प्राप्त करुन तक्रारकर्ता यांना तात्काळ माहिती द्यावी व अनुपालन अहवालासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०९.०४.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १७.०३.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

निर्गमित
दिनांक 19 MAR 2025

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ५२१/२०१९**
**तक्रारकर्ता श्री. वसंतलाल मेघजी नंदू**
**सुनावणी दिनांक : १६.०४.२०२५ (In continuation of order dt १७.०३.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित(प्रतिनिधी) |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, गृहनिर्माण भवन, बांद्रा, मुंबई यांनी माहिती जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ.प्र.) शहर, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडून प्राप्त करुन तक्रारकर्ता यांना तात्काळ माहिती द्यावी व अनुपालन अहवालासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणी वेळी तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ.प्र.) शहर, बृहन्मुंबई महानगरपालिका व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. १५.०४.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, तक्रारकर्ता यांना दि. २०.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती देण्यात आलेली आहे. तक्रारकर्ता यांनी मान्य केले की, त्यांना दि. २०.०३.२०२५ रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे. परंतु, तक्रारकर्ता यांच्या मते माहिती अर्जातील मुद्दा क्र. २, ३ व ४ ची निरंक माहिती देण्यात आलेली आहे. जेव्हा मुळ माहिती अर्जात सदर ठिकाणी त्यांचा विषय गार्डन विकसित करण्याचा तसेच झाडे लावून संगोपन करण्याचा होता.

या कारणामुळे जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा अभिलेख तपासून सुधारीत उत्तर तक्रारकर्ता यांना आदेशप्राप्तीच्या ७ दिवसांत नोंदणीकृत टपालाने द्यावे व केलेल्या कार्यवाहीच्या अनुपालन अहवालासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०९.०५.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास 17-4-2025

**मुंबई**
**दिनांक : १७.०४.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ५२१/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. वसंतलाल मेघजी नंदू**

**सुनावणी दिनांक : ०९.०५.२०२५ (In continuation of order dt १७.०४.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा अभिलेख तपासून सुधारीत उत्तर तक्रारकर्ता यांना आदेशप्राप्तीच्या ७ दिवसांत नोंदणीकृत टपालाने द्यावे व केलेल्या कार्यवाहीच्या अनुपालन अहवालासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ०९.०५.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, उद्यान विभागाशी संपर्क करुन माहिती प्राप्त करुन तक्रारकर्ता यांना दि. ०२.०५.२०२५ रोजी दिलेली आहे. तसेच, तक्रारकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत मी कोणत्याही प्रकारे हेतुपुरस्सर विलंब अथवा टाळाटाळ केलेली नाही. त्यामुळे सहानुभुतीपुर्वक विचार करुन प्रस्तुत प्रकरणी कोणत्याही प्रकारे शास्तीची कारवाई करण्यात येऊ नये अशी नम्रपणे कळकळीची विनंती.

तक्रारकर्ता यांनी लेखी सादर करुन नमुद केले की, मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : १३.०५.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**